साप्ताहिक लोकप्रभा

लोकसत्ता

१७ जून २०११




मुखपृष्ठ
तथ्यांश
पाक कौशल्य
तथास्तु
फुल्या फुल्या डॉट कॉम
प्रतिसाद
दास्ताँ-ए-दख्खन
कव्हर स्टोरी
शिक्षण
श्रद्धांजली
मेतकूट
हास्यकविता
सुरक्षा
माझी बाहेरख्याली
अभिनंदन
डेस्क टॉप
'डि'टॉक्स
राष्ट्रीय
नॉस्टॅल्जिया
खाली पेट
आरोग्य
प्रतिक्रीया
सामाजिक
घडामोडी
श्रीमान श्रीमती
शॉपिंग
वाचक प्रतिसाद
भविष्य
संपर्क
मागील अंक

Advertise with us



राजू परुळेकर

raju.parulekar@gmail.com



बाबू लोकांना भ्रष्टाचार करण्याकरिता नियम आणि कायदे जितके अधिक कडक असतील तितके हवे असतात. कोणताही 'स्कॅम' किंवा भ्रष्टाचाराचं 'स्कँडल' उघडकीस आलं की सरकारी बाबू (अपवाद वगळता) आनंदित होतात. जेणेकरून त्या स्कँडलमुळे नियम कडक झाल्याचं सांगून नवा भ्रष्टाचार करायला एक बागुलबुवा प्राप्त होतो.

# सरकारी चेक पॉइंटचा भ्रष्टाचार





भ्रष्टाचारविरोधी आंदोलनांमुळे देशात भ्रष्टाचार कमी होतो आहे वा नाही, हा एक संशोधनाचा विषय आहे. पण परिस्थितीजन्य पुराव्यांकडे पाहिलं तर तो कमी होत नाही असं दिसतं. बाबू लोकांना भ्रष्टाचार करण्याकरिता नियम आणि कायदे जितके अधिक कडक असतील तितके हवे असतात. कोणताही 'स्कॅम' किंवा भ्रष्टाचाराचं 'स्कँडल' उघडकीस आलं की सरकारी बाबू (अपवाद वगळता) आनंदित होतात. जेणेकरून त्या स्कँडलमुळे नियम कडक झाल्याचं सांगून नवा भ्रष्टाचार करायला एक बागुलबुवा प्राप्त होतो. बऱ्याच जणांना एखादा मोठा भ्रष्टाचार उघडकीला येऊन बरेचजण 'आत' गेले किंवा मोठमोठय़ांची नावं आली की वाटतं की, आता भ्रष्टाचार कमी होईल! पण घडतं ते उलट. ती नव्या मोठय़ा स्कॅमची किंवा स्कँडलची सुरुवात असते. कारण अशा प्रकारचा जो स्कॅम बाहेर येतो त्यामुळे सरकार कडक कारवाई करण्याचं आश्वासन देतं. ही कडक कारवाई करण्याचं काम त्याच बाबूंना करायचं असतं, जे जुन्या स्कॅममध्ये गुंतलेल्यांचे जातभाई असतात. त्यांची कडक कारवाई म्हणजे जुन्या स्कॅमची भीती दाखवून फाईल्स अडवून ठेवणं नि नव्या क्लायंटकडून जास्तीत जास्त पैसे वसूल करणं! नेमकं हे असंच होतं असं नाही. प्रत्येक वेळी हे होण्याची मोडस ऑपरेंडी वेगळी असते. पण आपल्याभोवतीच्या जगाचा दृष्टिकोन जो व्यावसायिक असल्यामुळे भ्रष्ट असतो असा समज आहे, तो जवळजवळ चुकीचा आहे. कारण इथं व्यवस्थाच अशी आहे की, जी त्याला प्रामाणिकपणे व्यवसाय करू देत नाही.

नीरा राडिया टेप प्रकरण उघडकीला आल्यावर अनेकांना त्याचा धक्का बसला. याचं कारण देशातल्या अत्यंत मोठय़ा उद्योगगृहांमध्येही अशा प्रकारे सरकारी बाबूंना नि दलालांना खूश करण्याचे उद्योग चालतात नि त्यात मोठमोठे उद्योगपतीसुद्धा गुडघ्यावर येतात. एवढंच नव्हे तर मोठं नाव असलेले पत्रकारही त्यात सामील व्हायला उत्सुक असतात, ही गोष्ट समाजाला अवाक् करणारी ठरली.



गेल्या ६४ वर्षांत जी पोलादी 'परमिटराज'ची संकल्पना आपण निर्माण केली ती सर्व जगातून केव्हाच कालबाह्य़ झालेली आहे. जगाच्या बाजारात विकसित देशांत कधीच एवढी परमिटं, एवढे परवाने नि एवढी लायसन्स कधीच कुणासाठीच काढावी लागत नाहीत. आपल्या देशात एवढय़ा फाईल्स, एवढय़ा टेबलांवरून, एवढय़ा बाबूंच्या हाताखालून जात असतात की शेवटी ती फाईल (जर सही होऊन) तयार झाली तर त्यावर फक्त सहीच उरते! यातली अतिशयोक्ती जरी सोडली तरीही ज्या प्रकारे आपल्याकडे फाईलराज आहे ते पाहता त्यातून नवनवीन सरकारी दलाल निर्माण होणार हे स्पष्टच आहे; परंतु हे फाईलराज आणि सहीराज संपून जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रयत्न गेल्या ६४ वर्षांत झालेला नाही. ग्लोबलायझेशनचा नारा दिल्यानंतर देशातील परमिटराज संपणार, अशा घोषणा नि आरोळ्या दिल्या गेल्या. वास्तविक परिस्थितीत जर हे फाईलराज नि परमिटराज संपले असते तर आज भ्रष्टाचाराबाबतची स्थिती खूप वेगळी असती. या फाईल्समुळे नि परमिटस नि लायसन्समुळे सरकारी कचेरीतील 'चेक पॉइंटस्' वाढत गेले. असे चेक पॉइंटस् वाढत गेल्यामुळे त्यातल्या भ्रष्टाचाराची साखळी, त्यात गुंतलेले बाबू, त्यातली कामे करून देणारे भ्रष्ट दलाल यांची साखळी प्रचंड वाढली. कोणत्याही व्यावसायिकाला अगदी तुरळक अपवाद वगळता या साखळीतील प्रत्येकाला खूश केल्याशिवाय व्यवसाय करता येणं शक्यच होत नाही. मुख्य अर्थव्यवस्थेतून बाजूला पडून समांतर अर्थव्यवस्थेची निर्मिती यातूनच सरकारी पातळीवर होत जाते. प्रचंड प्रमाणात मुख्य चलनव्यवस्थेतून बाहेर पडलेली कॅश या व्यवस्थेत फिरत राहत; ज्या कॅशमुळे भ्रष्टाचाराची सारी गंगोत्री निर्माण होते. ही गोष्ट सरकारमधल्या योजनाकर्त्यांना किंवा सरकारी उच्चपदस्थांना किंवा न्यायालयांना ठाऊक नाही असं थोडंच आहे? मुळात हल्ली भ्रष्टाचाराबाबत जे बोललं, लिहिलं जातं नि भ्रष्टाचारविरोधी जी आंदोलनं, उपोषणं केली जातात त्याला या फाईलराजचा अंत झाल्याशिवाय काहीच अर्थ उरत नाही. मूळ कायद्यांची नीट अंमलबजावणी न झाल्यामुळे भ्रष्टाचार वाढत असेल तर नवीन कायदे करून किंवा अस्तित्वात असलेलेच कायदे अधिक कडक करून कॅश वाढवणारी यंत्रणा निर्माण करून भ्रष्टाचार अजून वाढणार हे सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ आहे. आपल्याकडे व्यावसायिक मूल्यं नि व्यावसायिक दर्जा यांत वारंवर घसरण होताना आपण पाहतो. शिवाय अपार गुणवत्ता असलेली माणसं व्यवसायात शिरताना आपण पाहत नाही. मोठय़ा व्यवसायात संशोधन व त्यावर आधारित विकास आपल्याला दिसत नाही. या साऱ्याचं कारणही अनुषंगाने हेच आहे. कारण एखाद्या क्षेत्रात असाधारण गुणवत्ता निर्माण करायला प्रचंड सृजनशक्ती आणि बुद्धिमत्ता लागते. अशी सृजनशक्ती नि बुद्धिमत्ता असलेली माणसं स्वत:ला दलालांच्या आणि सरकारी बाबूंच्या भ्रष्टाचाराच्या साखळ्यांमध्ये गुंतवून घेऊ इच्छित नाहीत. त्यामुळे बऱ्याचदा सुमार आणि कमअस्सल दर्जाची माणसं आणि दलाली डोकं असणारी माणसं व्यवसायात पुढे पुढे जाताना दिसतात. सरकारी कार्यालयांमध्ये लागेबांधे जेवढे अधिक तेवढे व्यावसायिक म्हणून यशस्वी होण्याची शक्यता अधिक असते. हा अपवादात्मक नियम नसून सर्वमान्य नियम आहे. नीरा राडिया टेप प्रकरण उघडकीला आल्यावर अनेकांना त्याचा धक्का बसला. याचं कारण देशातल्या अत्यंत मोठय़ा उद्योगगृहांमध्येही अशा प्रकारे सरकारी बाबूंना नि दलालांना खूश करण्याचे उद्योग चालतात नि त्यात मोठमोठे उद्योगपतीसुद्धा गुडघ्यावर येतात. एवढंच नव्हे तर मोठं नाव असलेले पत्रकारही त्यात सामील व्हायला उत्सुक असतात, ही गोष्ट समाजाला अवाक् करणारी ठरली. पण यात अवाक् होण्यासारखं काही नाही. गेली ६४ वर्षं नेमकं हेच चाललेलं आहे. परमिट, कोटा, लायसन्स, फाईल्स यांच्या माध्यमातून होणाऱ्या भ्रष्टाचाराला स्व. इंदिरा गांधींनी 'ग्लोबल फिनॉमिनॉ' असं म्हटलं होतं. पण यातला फरक फक्त एवढाच की, त्या वेळी आपल्या बरोबरीची असलेली अनेक आशियाई राष्ट्रं प्रगतीच्या शर्यतीत आपल्याला मागे टाकून नि भ्रष्टाचारावर मात करून कुठच्या कुठं निघून गेली. आपण मात्र भ्रष्टाचाराच्या त्या चिखलात तसेच लोळत अजून पडून आहेत. भ्रष्टाचार रोखण्यासाठी सर्वात आधी ज्या गोष्टी व्हायला पाहिजेत त्यातली एक सर्वात अव्वल गोष्ट म्हणजे जनतेच्या उद्यमशीलतेमध्ये सरकारचा, सरकारी बाबूंचा, सरकारी नियमांचा कमीत कमी सहभाग. पण हे होणं नजरेच्या टप्प्यात दुरापास्त दिसतं. कारण भ्रष्टाचारावरची उत्तरं सगळेच जणं शोधताहेत. पण खरे प्रश्न कुणालाच ठाऊक नाहीत. शोधण्याची मनापासूनची इच्छाही नाही.